# भारत टॅलेंट सर्च परीक्षा सन २०२६

इयत्ता : २ री | माध्यम : मराठी व सेमी इंग्रजी | एकूण प्रश्न : ७५

वेळ : २ तास | **विषय : भाषा, गणित, परिसर अभ्यास व तार्किक विचार** | एकूण गुण : १५०

## अ विभाग

प्र.1 आकाशात रात्री  दिसतो.

1) सूर्य 2) चंद्र 3) ढग 4) चंद्र

प्र.2 दिलेली अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार कर व योग्य पर्याय निवड.

ब भा ण ही ऊ

1) उबभानही 2) बहिणउभा 3) बहीणभाऊ 4) भानबहीहू

प्र.3 कोण ते सांग व अचूक पर्याय निवड.

मी घराची राखण करतो.

1) गाय 2) कुत्रा 3) मांजर 4) बैल

प्र.4 कोण ते सांग व अचूक पर्याय निवड.

मला शिंगे आहेत. – ..................

1) गाय 2) कोंबडी 3) ससा 4) उंदीर

प्र.5 चित्रशब्द कोडे पूर्ण कर.



| | |
|---|---|
| सा | |
| ■ | थ |



1) कि 2) सा

3) प 4) झा

प्र.6 ‘लता झाडावर चढली’ या वाक्यातील ‘लता’ या अर्थाचा शब्द कोणता नाही तो शोध.

1) वेल 2) वेला 3) परजीवी 4) पर्याय २ व ३ बरोबर

प्र.7 सूचना – अचूक पर्याय ओळख.

मावशीच्या भावाला म्हणतात – .................

1) दादा 2) दादा 3) मामा 4) काका

प्र.8 ५६ ही संख्या अक्षरात कशी लिहिशील ?

1) पन्नास 2) बावन्न 3) साठ 4) छपन्न

How to write the number 56 in words ?

1) Fifty 2) Fifty Two 3) Sixty 4) Fifty Six

प्र.9 चार दशक + ............ एकक = ४५

1) चार 2) तीन 3) पाच 4) सहा

4 Ten + ............unit = 45

1) Four 2) Three 3) Five 4) Six

प्र.10 चाळीस म्हणजेच = ..............

1) ३ x १० 2) ५ x ८ 3) ८ x ४ 4) ५ x ६

Fourty means = .............

1) 3 x 10 2) 5 x 8 3) 8 x 4 4) 5 x 6

प्र.११ ६४ या संख्येत दशक स्थानाची संख्या एक ने वाढव आणि एकक स्थानची संख्या दोन ने कमी करून तयार होणारी नवी संख्या कोणती ?

1) ६५ 2) ७० 3) ७२ 4) ६४

In 64 number which is the new number formed by increasing the number of decimal place by one and decreasing the number of units place by two ?

1) 65 2) 70 3) 72 4) 64

प्र.१२ अर्णवची गाय दररोज ८ लीटर दूध देते तर एका आठवड्यात गाय किती लीटर दूध देईल ?

1) ६४ मीटर 2) ५६ लीटर 3) ६५ लीटर 4) ४८ लीटर

If Arnav's cow gives 8 litres of milk per day, how many litres of milk will the cow give in a week?

1) 64 metres 2) 56 litres 3) 65 litres 4) 48 litres

प्र.१३ ८२ या संख्येत कोणते विधान बरोबर आहे ?

1) ८ ची स्थानिक किंमत ८ आहे. 2) २ ची स्थानिक किंमत २० आहे.

3) ८ ची स्थानिक किंमत ८० आहे. 4) २ दशक स्थानी आहे.

Which statement is correct in the number 82 ?

1) The place value of 8 is 8. 2) The place value of 2 is 20.

3) The place value of 8 is 80. 4) 2 is in the tens place.

प्र.१४ जंगलाचा राजा कोणाला म्हणतात ?

1) वाघ 2) चित्ता 3) सिंह 4) अस्वल

प्र.१५ शाळेत जाताना तुम्ही कोणते कपडे घालता ?

1) टी शर्ट 2) कुर्ता 3) जिन्स 4) गणवेश

प्र.१६ पावसाचा आवाज आपण कोणत्या अवयवाच्या मदतीने ऐकतो ?

1) तोंड 2) नाक 3) हात 4) कान

प्र.१७ भाजीपाला, फळांची साले, उरलेले अन्न, झाडांची पाने यामुळे तयार होणाऱ्या कचऱ्याचा प्रकार कोणता ?

1) ओला कचरा 2) सुका कचरा 3) जैविक कचरा 4) पर्याय १ व ३ बरोबर

प्र .१८ रिकाम्या जागी कोणते अक्षर लिहिल्यास अर्थपूर्ण शब्द तयार होतील.

| | | |
|---|---|---|
| ..... | व | ळा |
| ..... | स | व |
| ..... | क | डी |

1) बा 2) मा

3) ज 4) का

प्र.१९ गटात न बसणारे पद ओळख.

1) हातोडा 2) चमचा 3) करवत 4) कुदळ

## ब विभाग

प्र. २० व २१ साठी सुचना – खालील उतारा वाच व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायातून शोध.

> परिसरात झाडे लावली पाहिजेत. झाडे आपल्याला फळे, फुले, लाकूड देतात. झाडे ऑक्सिजन देतात. झाडांमुळे पाऊस अडवला जातो. झाडांना तरु व वृक्ष देखिल म्हणतात.

प्र.२० झाडे आपल्याला काय देतात.

1) फळे 2) फुले 3) लाकूड 4) वरील सर्व

प्र.२१ उताऱ्यात झाडांना समानार्थी शब्द कोणता आलेला आहे ?

1) तरु 2) वृक्ष 3) पर्याय १ व २ 4) लाकूड

प्र.२२ अनेक बिया नसलेले फळ शोध.

1) डाळिंब 2) कलिंगड 3) आंबा 4) पपई

प्र.२३ फणस – साप – पपई – ईश – शर्यत ............. ?

1) तगर 2) रवी 3) मार 4) ईद

प्र.२४ 'शहाणा' या शब्दाला लागणारा योग्य प्रत्यय ओळख ?

1) आणा 2) दार 3) णार 4) पणा

प्र.२५ वाक्याच्या शेवटी कोणते विरामचिन्ह येते ?

1) , (स्वल्पविराम) 2) . पूर्णविराम 3) ? (प्रश्नचिन्ह) 4) ! (उद्गारवाचक)

प्र.२६ बापरे ! केवढा मोठा साप ! या वाक्यात वापरलेले विरामचिन्ह ओळख.

1) उद्गारवाचक 2) स्वल्पविराम 3) पूर्णविराम 4) स्वल्पविराम

प्र.२७ रिकाम्या चौकटीतील संख्येची मधली संख्या लिही.

| | | |
|---|---|---|
| २३ | | २५ |


1) २४ 2) २७ 3) २२ 4) २०

Guess the number that should be between the given numbers.

| | | |
|---|---|---|
| 23 | | 25 |

1) 24 2) 27 3) 22 4) 20

प्र.२८ दिलेल्या गोलांची संख्या मोजून लिही.




1) ३ 2) ४ 3) १ 4) ५

Count and write the number of circles.

1) 3 2) 4 3) 1 4) 5

प्र.२९ हत्तीच्या आधीचा डब्बा कितवा आहे ?



1) चौथा 2) पाचवा 3) तिसरा 4) दुसरा

Which number coach is there before elephant's coach?

1) fourth 2) Fifth 3) Third 4) second

प्र.३० जिराफाच्या डब्याचा क्रमांक शेवटून कितवा आहे ?

1) तिसरा 2) चौथा 3) पाचवा 4) दुसरा

What is the position number of the Giraff's coach from the end ?

1) Third 2) fourth 3) Fifth 4) Second

प्र.३१ चौकोन आणि आयत यांच्यातील समान गुणधर्म कोणता ?

1) चार समान बाजू 2) चार कोन 3) कोन नाहीत 4) तीन बाजू

Which property is common between a square and a rectangle ?

1) four equal side 2) four angles 3) No angles 4) Three sides

प्र.३२ सुनंदाकडे १९ गुलाबाची फुले, १५ कमळाची फुले व १० चमेलीचे फुले आहेत. फुलांच्या संख्येचा उतरता क्रम लावला असता मध्यभागी कशाची फुले येतील ?

1) गुलाब 2) कमळ 3) मोगरा 4) चमेली

Sunanda has 19 Rose flowers, 15 Lotus flowers and 10 Jasmine flowers. If the number of flowers is arranged in descending order, what will be the flowers in the middle?

1) Rose 2) Lotus 3) Mogra 4) Jasmine

प्र.३३ खालील कोणत्या आकृतीला फक्त तीन बाजू असतात ?

1) आयत 2) चौरस 3) गोल 4) त्रिकोण

Which of the following figures has only three sides?

1) Rectangle 2) Square 3) Circle 4) Triangle

प्र.३४ सूचना – चव ओळख.

चिंच

1) गोड 2) कडू 3) खारट 4) आंबट

प्र.३५ अचूक विधान ओळख.

1) भोपळा, टरबूज छोट्या झाडाला लागतात.
2) भोपळा, टरबूज छोट्या झुडपाला लागतात.
3) भोपळा, टरबूज छोट्या वेलीला लागतात.
4) भोपळा, टरबूज छोट्या तरुला लागतात.

प्र.३६ प्लास्टिक पिशव्यांऐवजी काय वापरावे ?

1) कागदी पिशवी 2) नायलॉन पिशवी 3) कापडी पिशवी 4) पर्याय १ व ३ बरोबर

प्र.३७ सूचना – सहसंबंध ओळख.

मध : मधमाशी : : कात : ?

1) लाल 2) पळस 3) कडू 4) खैर

●प्र.३८एका सांकेतिक भाषेत ४ ला ५ म्हणाले, ५ ला ६ म्हणाले, ६ ला ७ म्हणाले, तर ४ + ६ – ५ = ?

1) ५ 2) ६ 3) ७ 4) ८

In a code language, 4 is called 5, 5 is called 6,and 6 is called 7. Then what is 4 + 6 – 5 = ?

1) 5 2) 6 3) 7 4) 8

## क विभाग

प्र. ३९ व ४० साठी सूचना – खालील कविता वाच आणि त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे पर्यायातून निवड.

मेट्रो रेल्वे आली रे
नसे धुरांच्या रेषा,
नाही झुकझुक भाषा
मेट्रो रेल्वे आली रे.

रस्त्यावरील रहदारीची
कोंडी करते कमी,
आवाज नाही धूर नाही
प्रदूषण मुक्तीची देते हमी.

प्र.३९ वरील कवितेत पुढीलपैकी कोणत्या वाहतुकीच्या साधनाचा उल्लेख आला आहे ?

1) विमान 2) बस 3) जहाज 4) मेट्रो रेल्वे

प्र.४० मेट्रो रेल्वेच्या बाबतीत पुढीलपैकी अयोग्य पर्याय निवड.

1) धूर सोडत नाही. 2) आवाज करत नाही.

3) प्रदूषण करते. 4) रस्त्यावरील रहदारीची कोंडी कमी करते.

प्र.४१ प्रणालीने ................ च्या चाकात हवा भरली.

1) आगगाडी 2) बैलगाडी 3) बोट 4) सायकल

प्र.४२ सूचना – पुढील वाक्यातील सर्वनाम ओळख.

मी दुसरीत शिकत आहे.

1) मी 2) दुसरीत 3) शिकत 4) आहे

प्र.४३ 'डोळेझाक करणे' या अर्थाचा योग्य वाक्प्रचार निवड.

1) लक्ष न देणे 2) झोप येणे 3) समाधान होणे 4) बेसावध असणे

प्र.४४ ट् + र = ?


1) ट्र 2) टर 3) ट्र 4) ट्रा

प्र.४५ 'पुस्तक' या शब्दाचा वाक्यात उपयोग करून अचूक पर्याय निवड.


1) मी पुस्तक वाचला. 2) पुस्तकात गोष्टी हाहेत.

3) पुस्तक वाचायला मला आवडतो. 4) मी गोष्टीचे पुस्तक वाचते.

**आत – बाहेर**



**Inside - outside**



प्र.४६ व प्र. ४७ साठी सूचना – वरील चित्राचे निरीक्षण कर आणि पुढील प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवड.

Observe the picture above and choose the correct option for the answer to the following questions.

प्र.४६ शेतकरी कुंपणाच्या कोठे आहे ?

1) मागे 2) पुढे 3) आत 4) बाहेर

Where is the farmer from the fence?

1) Back 2) Next 3) Inside 4) Outside

प्र.४७ पुढील पर्यायापैकी अयोग्य पर्याय निवड.

1) कुत्रा झाडाखाली आहे. 2) कावळा फांदीवर आहे.

3) कोंबडा घराच्या आत आहे. 4) शेतकरी कुंपणाच्या आत आहे.

Choose the wrong option from the following options.

1) The dog is under the tree. 2) The crow is on the branch.

3) The cock is inside the house. 4) The farmer is inside the fence.

प्र.४८ प्रणिताला १५ रुपयांची पट्टी घ्यायची आहे. तर तिने दुकानदाराला खालीलपैकी कोणत्या पर्यायाची रक्कम द्यावी ?

1) ५ रुपयांची ३ नाणी 2) एक १० रुपयांची नोट 3) तीन २ रुपयांची नाणी 4) १० नाणी १ रुपयांची

Pranita wants to buy a scale of Rs.15. So which of the following options should she pay to the shopkeeper?

1) 3 coins of 5 rupees 2) One 10 rupees note

3) Three 2 rupee coins 4) 10 coins of 1 rupees

प्र.४९ आर्याने दुकानातून २० रुपयांचा एक पेन, ५ रुपयाची एक पेन्सिल व २५ रुपयाची एक वही खरेदी केली तर त्याने एकूण किती रुपयाची खरेदी केली ?

1) ६० रुपये 2) ५० रुपये 3) ७० रुपये 4) ८० रुपये

Aarya purchased a pen worth Rs 20, a pencil worth Rs 5 and a notebook of Rs 25 from shop. How many rupees she spent in total ?

1) 60 Rs. 2) Rs.50 3) 70 Rs. 4) 80 Rs.

प्र.५० मराठी महिन्यांमध्ये अग्रहायण महिना कितव्या क्रमांकाला येतो व तो किती दिवसांचा असतो.

1) ९, ३१ 2) ९, ३० 3) ८, ३० 4) ७, ३०

In the Marathi months, what is the position of the month 'Agrahayan' and how many days does it have?

1) 9, 31 2) 9, 30 3) 8, 30 4) 7, 30

प्र.५१ योग्य जोडी ओळख.

1) ५ रुपयांची ६ नाणी = ३० रु. 2) १० रुपयांच्या ५ नोटा = ५५ रु.

3) २० रुपयांच्या ४ नोटा = २४ रु. 4) ५ रुपयांची १० नाणी = १५ रु.

Identify the proper pair.

1) 6 coins of 5 Rupees = 30 Rs. 2) 5 notes of 10 rupees = 55 rupees.

3) 4 notes of 20 rupees = 24 Rs. 4) 10 coins of 5 rupees = 15 Rs.

प्र.५२ सहसंबंध लाव.

हवा : विमान : : पाणी : ?

1) सायकल 2) रिक्षा 3) हेलिकॉप्टर 4) होडी

प्र.५३ योग्य पर्याय निवड.

शिंकताना व खोकताना नेहमी याचा वापर करावा.

1) हातरुमाल 2) हात 3) काही वापरु नये 4) यापैकी नाही

प्र.५४ संगणकाच्या या भागाचे नाव काय ?



1) माऊस 2) मॉनिटर

3) कीबोर्ड 4) प्रिंटर

प्र.५५ पिवळ्या रंगाचे फुल कशाचे असते ?

1) सुर्यफुल 2) तरवड 3) कमळ 4) पर्याय १ व २ बरोबर

प्र.५६ खालीलपैकी अयोग्य कृती कोणती आहे ?

1) रघु नियमितपणे नखे कापतो. 2) राहुल गळणाऱ्या नळांची माहिती ग्रामपंचायतीला देतो

3) ज्योत्स्ना तिकीट न काढता प्रवास करते. 4) रस्ता ओलांडण्यासाठी विवेक झेब्रा क्रॉसिंगचा वापर करतो.

प्र.५७ सुमितच्या आईच्या भावाच्या भाच्याशी सुमितचे नाते काय ?

1) स्वत: 2) स्वत: किंवा भाऊ 3) सांगता येत नाही 4) पर्याय १ व २ बरोबर

## ड विभाग

प्र.५८ ते प्र.६० साठी सूचना – खालील कविता वाच व प्रश्नांच्या उत्तराचा अचूक पर्याय शोध.

### दूर डोंगरात उभा

दिवा घेऊनिया हाती,
कोण आई, येतो दिनी.

कधी वर कधी खाली,
येणे जाणे त्याचे चाले.

डोळे दिपावया असे,
फेकी किरणांचे भाले.

आकाशात पसरवी,
रंग तांबडा पिवळा.

त्याला नाही थंडी ऊन,
ऋतू पाऊस, उन्हाळा.

सागरात बुडून जातो,
पुन्हा पोहूनिया येतो.

सारे गुण गाती त्याचे,
कधी अभ्यास करतो?

– सारिका बद्दे

प्र.५८ किती ऋतूंची नावे कवितेत आली आहेत ?

1) ३ 2) ४ 3) २ 4) ५

प्र.५९ वरील कविता कोणत्या विषयावर आहे ते सांग ?

1) सूर्य 2) चंद्र 3) आकाश 4) रात्र

प्र.६० 'दिवस' या शब्दाला समानार्थी कोणता शब्द कवितेत आला आहे ?

1) चंद्र 2) दिन 3) रजनी 4) आकाश

प्र.६१ गटात न बसणारा शब्द शोध.

1) आकाश 2) सूर्य 3) चंद्र 4) पाणी

प्र.६२ आपण नामाचे एकवचन रूप केव्हा वापरतो ?

1) जेव्हा एकापेक्षा जास्त असतात 2) जेव्हा फक्त एक असेल

3) आम्हाला पाहिजे तेव्हा 4) अनेकवचन असेल तेव्हा

प्र.६३ चुकीचा जोडशब्द ओळख.

1) पालापाचोळा 2) दिनरात 3) खराबेरा 4) भाजीभाकरी

प्र.६४ घड्याळावरील कोणता काटा सर्वात वेगाने फिरतो ?

1) तास काटा 2) मिनिट काटा 3) सेकंद काटा 4) दिवस काटा

Which hand of the clock moves the fastest ?

1) Hour hand  2) Minute hand  3) Second hand  4) Day hand

प्र.६५ ख्रिसमस कोणत्या महिन्यात असतो ?

अ) नोव्हेंबर  ब) सप्टेंबर  क) ऑक्टोबर  ड) डिसेंबर

In which month is Christmas ?

1) November  2) September  3) October  4) December

प्र.६६ जानेवारी, मार्च, मे, जुलै, सप्टेंबर ...........

1) ऑक्टोबर  2) मार्च  3) नोव्हेंबर  4) जुलै

January, March, May, July, September......

1) October  2) March  3) November  4) July

प्र.६७ २५, १६, .............., ४, १

1) ८  2) ९  3) १०  4) १२

25, 16, .... 4, 1

1) 8  2) 9  3) 10  4) 12

प्र.६८ सागरने दुकानदाराला २०० रु. देऊन ४८ रु. ची २ किलो साखर आणि ४३ रु. चा १ किलो गुळ व २३ रु. चे १ किलो शेंगदाणे घेतले तर दुकानदार सागरला किती रुपये परत देईल ?

1) ८६  2) ६८  3) ८० + ६  4) पर्याय १ व ३ बरोबर

Sagar gave the shopkeeper 200 Rs. and bought 2 kg of Sugar at 48 Rs. 1 Kg of Jaggery at 32 Rs. and 1 kg of groundnuts at 23 Rs. then how many Rs. the shopkeeper will return to Sagar.

1) 86  2) 68  3) 80 + 6  4) option 1 and 3 is correct

प्र.६९ क्रिकेट खेळताना विराटने ७६ व शुभमने ५७ धावा काढल्या, तर विराटने शुभमपेक्षा किती धावा जास्त काढल्या ?

1) २६  2) १६  3) १९  4) १८

While playing cricket, Virat scored 76 runs while Shubham scored 57 runs, then how many more runs made by Virat than Shubham?

1) 26  2) 16  3) 19  4) 18

प्र.७० तुमच्या पाण्याच्या बाटलीतील उरलेल्या पाण्याचे तुम्ही काय करू शकता ?

1) फेकून देऊ.  2) ते नाल्यात ओतू.

3) रोपाला पाणी देऊ.  4) ते जमिनीवर पसरवू.

प्र.७१ महाराष्ट्राची राजधानी कोणते शहर आहे ?

1) दिल्ली  2) मुंबई  3) कोलकात्ता  4) चेन्नई

प्र.७२ बाहेर सूर्य आग ओकत होता. हे वर्णन कोणत्या ऋतूतील आहे ?

१) उन्हाळा  २) हिवसाळा  ३) हिवाळा  ४) पावसाळा

प्र.७३ अयोग्य गट ओळखा.

1) चैत्र, वैशाख, ज्येष्ठ  2) पौष, माघ, फाल्गुन

3) श्रावण, भाद्रपद, अश्विन  4) अग्रहायण, आषाढ, कार्तिक

प्र.७४ सुरेश उगवत्या सुर्याला नमस्कार करुन डावीकडे दोन वेळा काटकोनात वळला तर त्याच्या समोरची दिशा कोणती ?

1) उत्तर 2) दक्षिण 3) पश्चिम 4) पूर्व

If Suresh bows to the rising sun and turns left twice at right angles, what will be the direction in front of him?

1) North 2) South 3) West 4) East

प्र .७५ वाघाच्या गुहेत शिरलेला माणूस जिवंतपणे बाहेर पडू शकेल का ?

1) वाघ त्याला खाऊन टाकेल. 2) वाघ त्याला मित्र बनवेल.

3) नक्कीच ! पण त्या गुहेत वाघ नसला पाहिजे. 4) नक्कीच ! पण वाघ डरकाळी फोडेल.

------

SPACE FOR ROUGH WORK